
बलस्थाने ओळखा
कुणाच्याही आधाराशिवाय
प्रत्येकाला जगता
येण्यासाठी अनेकार्थाने
स्वावलंबी असायला
पाहिजे.
टुडे

सकाळ

# बलस्थाने ओळखा!

अश्विनी भिडे (व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ)

जागर स्त्रीशक्तीचा

आपली लक्ष्मणरेषा आपण ठरवली तर पुरुषांनी त्यांच्या सोयीची केलेली चौकट मोडून पडेल; मात्र करियर करणाऱ्या स्त्रियांसमोरील आव्हानांविषयी वस्तुनिष्ठ चर्चा होत राहणे हे सुदृढ समाजाच्या दिशेने जाण्यासाठी आवश्यकच आहे. बाईकडे समाज कसा पाहतो यापेक्षा आपणच आपल्याकडे कसे बघतो हे महत्त्वाचे आहे. व्यक्ती म्हणून आपले स्थान आपण कसे निर्माण केले आहे, यावर समाज आपल्याकडे पाहत असतो.

कुणाच्याही आधाराशिवाय प्रत्येकाला जगता येण्यासाठी अनेकार्थानि स्वावलंबी असायला पाहिजे. तुम्हाला स्वत:चा पैसा स्वत: कमावता आला पाहिजे, त्याप्रमाणे योग्य निर्णय ठामपणे घेण्याची क्षमताही विकसित झाली तरच तुमचा विकास होतो. महिला 'मल्टिटास्किंग' आणि संयमी असतात. त्याचा निश्चितच फायदा कामामध्ये असतो. आपली बलस्थाने ओळखा. करियर हे केवळ अर्थार्जनाचे साधन नसते, तर एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी, स्वत:चे अस्तित्त्व निर्माण करण्यासाठी असते. ज्या कुटुंबामध्ये करियर करणारी स्त्री असते, त्या कुटुंबातल्या विचारसरणीमध्येदेखील फरक पडतो.



बाई असण्याचा बाऊ करून महिलेने मागे राहता कामा नये. आपण बाई म्हणून कुठले फायदे घेतले नाहीत, तर समाजाचाही आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. एखादी चांगली गोष्ट चिकाटीने केली तर यश उशिरा मिळेल, पण नक्कीच मिळते असा माझा अनुभव आहे. मेट्रो प्रकल्पावर काम करताना याचा मला कायम अनुभव येत असतो. अनेक वर्षे पायाभूत सुविधेच्या क्षेत्रात काम केल्यानंतर समस्या किंवा प्रश्न कसे हाताळावेत हे हळूहळू शिकत गेले. कालांतराने तुम्हाला अडचणीचे प्रश्न हाताळण्याचा आत्मविश्वास येतो. कुठल्या प्रश्नांचा बाऊ किती करायचा आणि कुठले प्रश्न सोडवायला जास्त वेळ लागणार असेल तर संयम कसा ठेवायचा हेदेखील तुम्हाला पूर्वानुभवाने समजू लागते. लोकांचे प्रश्न असतील तर त्यांच्याशी संवाद कसा साधायचा आणि तांत्रिक प्रश्नांची उकल कशी करायची हे तुम्ही सरावाने शिकत जाता. एकाच वेळी अनेक पातळ्यांवर आपल्या शक्तीच्या बाहेर जाऊन लढण्यापेक्षा आता प्राधान्य कशाला द्यायला पाहिजे हे ठरवावे लागते. अशा वेळी विचारांची स्पष्टता पाहिजे. अनेक गोष्टींना महत्त्व दिले तर नंतर तणाव निर्माण होतो. नेमके आपल्याला काय पाहिजे हे ठरले तर 'फोकस' काम करता येते.

**(शब्दांकन : दीपा कदम)**